बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ रे | अंक २९५ | गुरूवार, दि. २५ जानेवारी २०२४ | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | पान १ | पाने ४ | किंमत ३ रूपये

Beed (Maharashtra) | Year 3 | Issue 295 | Thursday 25 January 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | Page 1 | Pages 4 | Price 3

दैनिक

छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, लातूर, धाराशिव

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड | datta.narnale@gmail.com | dailymarathwadapatra2021@gmail.com | epaper : https://marathwadapatra.com | Eportal-https://marathwadapatra.com | Mo. 9822152955

रुद्राक्ष आणि भगवे कपडे घालून बाळासाहेब होता येत नाही

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांना टोला

मराठवाडा पत्र न्यूज । सातारा

बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे कपडे आणि रुद्राक्ष घालून त्यांच्यासारखे होता येत नाही. त्यासाठी मनात बाळासाहेबांचे विचार असावे लागतात. ते विचार त्यांनी सोडले आहेत, असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांच्यावर केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या त्यांच्या दरे गावातील उत्तेश्वर देवाचा यात्रेसाठी आलेले आहेत. आज त्यांनी त्यांच्या शेतात स्वतः काम करत रोटर फिरवला आणि हळदीच्या शेतात हळद काढण्याचे काम देखील केले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, लांडग्यांनी वाघाचं कातडं पांघरल म्हणजे लांडगा वाघ होत नाही. त्याला वाघाचं काळीज लागत. वाघ एकच बाळासाहेब ठाकरे! बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे ज्वलंत विचार ते घेऊन आम्ही पुढे चालली आहे. माझी शिवसेना कॉंग्रेस होईल तेव्हा मी माझ दुकान बंद करेन म्हणणारे बाळासाहेबांचे विचार मग मिंधेपणा कोणी केला याचा विचार जनतेनी केला आहे. सत्तेसाठी, खुर्चीसाठी उध्दव ठाकरेंनी बाळासाहेबांचे विचार त्यागले आणि स्वार्थासाठी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसले. बाळासाहेबांसारखे कपडे आणि रुद्राक्ष घालून बाळासाहेब होता येत नाही. त्यासाठी बाळासाहेबांचे विचार असावे लागतात ते विचार त्यांनी सोडले आहेत. उद्धव ठाकरे यांनी मोदींना साष्टांग दंडवत लोटांगण घालायला पाहिजे होते, पण ते कॉंग्रेसला घालायला लागलेत. त्यामुळे मी काल पण हेच बोललो आहे. पब्लिक सब जानती है! काल त्यांनी माझ्यावर टीका केली, तरी त्यांनी मोदींवर टीका केली. काय अधिकार आहे, ज्या मोठी साहेबांनी बाळासाहेबांचे स्वप्न काश्मीरमध्ये ३७० कलम हटवून साकार केले, असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.

भर दिवसा चोरट्यांनी फोडले सरपंचाचे घर

मराठवाडा पत्र न्यूज । शिरूर

तालुक्यातील लोणी येथे संत. खंडोजीबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्ताने सुरू असलेल्या सप्ताहाची सांगता मंगळवार दि. २३ होती काल्याच्या किर्तनासाठी घरातील सर्व व्यक्ती किर्तन ऐकण्यासाठी व प्रसादासाठी गेले होते. पालकमंत्री धनंजय मुंडे हे देखील सप्ताहाला भेट देण्यासाठी आले असल्याची संधी साधत सरपंच यांच्या सतत कामावर असलेल्या दोघांनी घराचा दरवाजा लोखंडी टिकावाने तोडून कपाटात असलेली रक्कम पळविली ज्यांच्यावर संशय होता व तो खरा ठरना असल्याने दोन्ही आरोपी पोलीसाच्या ताब्यात आहेत. सरपंच किसनदेव महादेव बडे यांनी शेतक-याकडून खरेदी केलेला कापुस पाठळसिंगी फाट्यावर विकी करुन आलेले पैसे कपाटात ठेवल्याची माहिती असल्याने

आरोपीने घरात कुणीच नसल्याचे पाहून घर फोडून चोरी केली माळवदारून दोघे पळून जात असल्याचे सरपंचाचे पुतने गणेश बडे यांनी पाहिले व चुतने किसनदेव यांना फोन करून सांगितले. दरम्यान आरोपी पळून गेले असले तरी चोरी यांनीच केल्याची खात्री झाल्याने संशयीत म्हणून किसनदेव बडे यांनी फिर्याद देत असताना सांगितले त्यांना पोलीसांनी ताब्यात देखील घेतले.

नमो नवमतदाता संमेलनात युवा व नवीन मतदारांनी सहभाग घ्यावा – जगताप

माजलगाव (प्रतिनिधी):- २५ जानेवारी हा दिवस आपल्या देशामध्ये राष्ट्रीय मतदाता दिन म्हणून साजरा केला जातो या राष्ट्रीय मतदाता दिनाचे औचित्य साधून २५ जानेवारी रोजी संपूर्ण देशात नमो मतदाता संमेलन भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित केले आहे. यामध्ये युवांना नवीन मतदाता बनण्यासाठी जगृत व आपल्या मताचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री हे युवांसाठी अनेक कल्याणकारी योजना चालवत आहेत त्यामुळे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला युवा एक सक्षम नेतृत्व मानत आहे. या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी माजलगाव विधानसभा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांनी माजलगाव येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव व स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय माजलगाव या दोन ठिकाणी सकाळी १० वाजता या नमो मतदाता संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नवीन मतदार यांना मार्गदर्शन व त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यामुळे माजलगाव मतदारसंघातील युवांनी व सर्व नवीन मतदार यांनी या संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन मोहनराव जगताप यांच्या वतीने केले आहे.

उपविभागीय कार्यालयातील कारकुन लाच घेताना जेरबंद

माजलगाव (प्रतिनिधी): येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कारकुन वैभव जाधव वास बीड एसीबी अधिकाऱ्यांनी तीस हजाराची लाच घेताना बुधवार रोजी दुपारी तीन वाजता ताब्यात घेण्यात आले. यावेळी कार्यालयात बसलेल्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना जेवता जेवता फरार झाल्याचे सांगण्यात येत आहे.

माजलगाव विभागीय कार्यालतील कारकूनन वैभव जाधव यांच्याकडे या कार्यालयातील गौण खनिज व जातीचे प्रमाणपत्र हे विभाग होते. पकडलेली वाळूची गाडी सोडण्यासाठी तीस हजार रुपयाची लाच घेतांना पकडण्यात बीड एसीबीच्या अधिका-यांनी रंगेहाथ पकडले असल्याचे सांगितले जात आहे.

ही कारवाई झाली तेव्हा येथील उपविभागीय अधिकारी नीलम बाफना या आपल्या कार्यालयात जेवण करत होत्या. ही माहिती मिळताच नीलम बाफना जेवण करत असतानाच उठून पळत गेल्या व खाली असलेल्या जीप चालकाच्या मोटरसायकलवर पळून जाण्यास यशस्वी झाल्या असल्याचे या ठिकाणी असलेल्या नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

मुलींना भाषणाची संधी देऊन जिजाऊ जयंती अनोख्या पद्धतीने झाली साजरी

मराठवाडा पत्र न्यूज । बीड

लोकनेते स्व.विनायकराव मेटे यांचा वैचारिक व सामाजिक वारसा चालवत राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीदिनी पोस्टमन कॉलनी मधील व परिसरातील फक्त मुलींना भाषणाची संधी देऊन अनोख्या पद्धतीने जिजाऊंची जयंती साजरी करण्यात आली.

पोस्टमन कॉलनी व पांगरी रोड परिसरातील शालेय विदयार्थीनी कु.प्रगती ठोसर,आर्या लोकरे, भाग्यश्री लांब,वैष्णवी गमे,राधिका कवठेकर, कोयल खरात,आरोही तंबोड, तेजस्विनी काळे, वैभवी बडे,देवयानी कदम, साक्षी कौचट, स्वरा विद्यागर यांनी राजमाता जिजाऊंच्या स्मृतींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले.राजमाता जिजाऊची महती जिजाऊंच्या लेकीकडून ऐकताना परिसरातील लोकांना विलक्षण आणि सुंदर अनुभव देऊन गेला. यामुळे एक वेगळा अभिवादनाचा कार्यक्रम या निमित्ताने पहावायास मिळाल्याचे मुलींच्या पालकांनी व परिसरातील नागरिकांनी सांगितले. याप्रसंगी सुनिता दहिवाळे, मनीषा बडे,ज्योती आव्हाड, श्रुती गमे, रिटा काकडे,संगीता कोठेकर, राधिका किंबहुने, योगिता अडसूळ,ऋतुजा डोके, सुनिता लोकरे,जाधव मावशी,गायके मावशी तसेच परिसरातील महिलांच्या उपस्थिती लक्षणीय होती.तसेच सूत्रसंचालन नेहा काकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संगीता ठोसर. आंदी उपस्थित होत्या.

मराठ्यांच्या मोर्चामुळे सरकारला टेन्शन

आरक्षणाशिवाय माघार नाही- जरांगे पाटील

पुणे (प्रतिनिधी):- सरकारला वाटले मराठे कुठे येणार मुंबईला. पण मराठे बंगा भरून मुंबईकडे निघाल्यावर सरकारला टेन्शन आले आहे. मार्गात कितीही अडचणी आल्या, तरी मुंबईला जाणारच आणि आरक्षण मिळाल्याशिवाय माघारी येणार नाही,' असे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी सणसवाडीत सांगितले. मराठा आरक्षणासाठी मुंबईकडे निघालेले मनोज जरांगे पाटील यांचे पुणे जिल्ह्यात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात फुले उधळून स्वागत करण्यात आले. नगरहून निघालेला मोर्चा मंगळवारी रांजणगावात आल्यावर गणपतीचे दर्शन घेऊन ते पुढे निघाले. मोर्चामध्ये शेकडोच्या संख्येने वाहने आणि हजारो समर्थक आहेत. शिक्रापूरमध्ये आल्यावर नागरिकांनी ढोल-ताशाच्या निनादात आणि पुष्प उधळून त्यांचे स्वागत केले. त्यानतंर रात्री साडेनऊच्या सुमारास जरांगे पाटील यांचा ताफा सणसवाडीत पोहचला. सणसवाडीकरांनी प्रचंड उत्साहात त्यांचे स्वागत केले. या वेळी जरांगे पाटील यांनी रस्त्यावर वाहनांचा ताफा थांबवून जीपवर

चढून शेकडो नागरिकांच्या गराड्यात भाषण केले. त्यानंतर रात्री दहाच्या सुमारास मनोज जरांगे पाटील यांनी वढू बुद्रुक येथे जाऊन छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. रात्री उशिरा जरांगे पाटील शहरात (वाघोली) दाखल झाले. उबाळेनगर येथील एका फार्म हाउसवर ते मुक्काम करणार आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी पुणे पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. आज, बुधवारी सकाळी ते पिंपरीकडे कूच करणार आहेत. या वेळी रस्त्यावर पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात केला आहे.

पंकजाताई मुंडे, खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते विजेत्यांनी स्विकारली बक्षिस

व्हॉलीबॉलच्या टीपीएस कॉलनी संघाने पटकावले २१ हजाराचे बक्षीस

परळी (प्रतिनिधी):- भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आज भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते रोख रक्कमेची बक्षीस देण्यात आली. व्हॉलीबॉल स्पर्धेत टीपीएस कॉलनी संघाने विजेतेपद पटकावले, हा संघ २१ हजाराच्या बक्षीसाचा मानकरी ठरला. शक्तीकुंज वसाहतीमधील भेल स्कूलच्या केजी हॉलमध्ये हा बक्षीस वितरणाचा सोहळा मोठ्या थाटात पार पडला. भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, भा.शि. प्र.संस्थेचे कार्यवाह हेमंत वैद्य, वसंतराव देशमुख, विकासराव डुबे, शांतीलाल जैन, रामभाऊ कुलकर्णी, अमरनाथ खुर्पे, विष्णुपंत कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. बक्षीस वितरणापूर्वी भेल स्कूलच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन पंकजाताई व खा.प्रितमताई यांच्या हस्ते विधिवत पूजन करून झाले.

नमो चषकमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव मिळाला आहे, अशा स्पर्धा सातत्याने घेऊन खेळाडूंना प्रोत्साहन देऊ असं यावेळी पंकजाताई म्हणाल्या. खा.प्रितमताई यांनी विजयी स्पर्धकांचं अभिनंदन करून स्पर्धेसाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षक व परिक्षकांचे आभार मानले. नमो चषक स्पर्धेसाठी सहकार्य करणारे शिक्षक सर्वश्री अजय जोशी,विलास आरगडे विजय मुंडे, प्रा जगदीश कावरे, यशवंत कांबळे,विजय बैंडसुरे, चंद्रकांत चाटे,पी टी मुंडे तसेच रांगोळीचे परिक्षक सोनाली ठक्कर, किर्ती इंगर, कृष्णा बेंडे यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. नमो

चषक अंतर्गत घेण्यात आलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत टीपीएस कॉलनी संघाने विजेतेपद व सेव्हन फिटनेस हब संघाने उप विजेतेपद पटकावले, त्यांना पंकजाताई व खा.प्रितमताई यांच्या हस्ते अनुक्रमे २१ हजार व १५ हजाराचे रोख रक्कमेचे बक्षीस देण्यात आले.

अडीच कोटी रुपयांच्या रस्त्याचा अडीच महिन्यात धुराळा – मनोज फरके

मराठवाडा पत्र न्यूज । माजलगाव

नगर परिषदेच्या वतीने विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत सन २०२१ २२ साठी दोन कोटी पन्नास लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने नगरपरिषद शॉपिंग कॉम्प्लेक्स स्वामी पर्वत सी सी रोड करणे, नगरपरिषद शॉपिंग कॉम्प्लेक्स ते स्टेट हायवे मेन रोड सी सी रस्ता व नाली करणे , डॉ स्वामी यांचे घर ते यशवंत चौक पर्यंत सी सी रस्ता करणे या सह अनेक रस्त्याचे कामे नाली न करता निकृष्ट पद्धतीने अडीच महिन्यापूर्वी करण्यात आले .माजलगाव शहरातील रस्ते कामात गुंतेदाराला टोल द्यावा लागत असल्याने कामे खराब होत असुन लोकांनी सतर्क राहुन कामे चांगले करून घ्यावेत खराब काम राष्ट्रवादी युवक काँग्रेस कदापिही खपवुन घेणार नाही. शासनाच्या अडीच कोटी रुपयांना चुना लावण्याचे काम संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांनी संगनमताने केले आहे. हे काम पंधरा दिवसाच्या आत मध्ये पुनश्च करण्यात यावेत अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळ फासण्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज फरके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

जिल्हा विशेष
दैनिक मराठवाडा पत्र
संभाजीनगर,बीड,जालना,परभणी,लातूर,धाराशिव
जनसामान्यांचे शस्त्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
गुरुवार, दि. २५ जानेवारी २०२४ पान 4

अंक वाटपासाठी मुले पाहिजेत

दैनिक मराठवडा पत्रचे अंक वाटपासाठी मुले पाहिजेत. गरजुंनी प्रत्यक्ष भेटावे.
-------:: पत्ता ::--------
दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय ,सहयोगनगर जालना रोड, बीड.
मो.: 9822152955

बीड नगरपरिषदेच्या कामात प्रशासकीय मान्यतेचा गोंधळ

आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्याकडून चौकशीची मागणी

बीड (प्रतिनिधी):- नगरपरिषदेच्या अंतर्गत होणार असलेल्या कामांच्या प्रशासकीय मान्यतेचा मोठा गोंधळ समोर आला आहे. बीड नगर परिषदेच्या कामाला चक्र वडवणी नगरपंचायतला दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आधारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भाने अशाप्रकारचे अनेक प्रकार झाले असल्याची शक्यता असून याबाबत सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी केली आहे.

बीड नगर परिषदेचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत प्रभाग क्रमांक २२ मध्ये घाने काकू ते वंदना नवनाथ वाघमारे यांच्या घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करणे. या अंदाजीत २० लाख रूपयांच्या कामाला दि.१५ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील तांत्रिक मान्यता क्रमांक ७६२ च्या आधारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली. परंतु ७६२ क्रमांकाची तांत्रिक मान्यता दि.५ जानेवारी २०२४ रोजी वडवणी नगरपंचायतीच्या एका कामाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून अगोदरच देण्यात आली असल्याचे उघड झाले आहे. बीड नगरपरिषद व सह-आयुक्त नगरपरिषद प्रशासन यांच्याकडून कुठलीही खातरजमा न करता, दुसर्या कामाच्या तांत्रिक मान्यतेच्या आधारे प्रशासकीय मान्यता काढणे अत्यंत गंभीर चुकीचा प्रकार आहे. अशाप्रकारे अनेक कामांच्या बाबतीत गोंधळ झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने या प्रकरणाची चौकशी करण्यात अशी मागणी आ.क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी केली आहे. याबाबत मुख्य सचिव, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, नगर परिषद प्रशासन आयुक्त तथा संचालक, संभाजी नगरचे विभागीय आयुक्त, बीडचे जिल्हाधिकारी नगरपरिषद प्रशासन जिल्हा सह-आयुक्त व बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे आ.क्षीरसागर यांनी पत्रव्यवहार केला असून नियमांच्या अधीन राहून कायद्यानेच कामे करण्यात यावीत अशी मागणी केली आहे. दरम्यान मागील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक कामे दुबार असण्याची व कामांमध्ये अनियमितता असण्याचा संशय व्यक्त केला होता.

प्रभु श्रीराम भक्तांचा पाचशे वर्षाचा वनवास संपला - खा.प्रितमताई मुंडे

तमाम हिंदू बांधवांची भावना नरेंद्र मोदिजींनी पूर्ण केली – राजेंद्र मस्के

बीड (प्रतिनिधी):- अयोध्या राम मंदिराचा पावशे वर्षाचा लढा आज संपुष्टात आला. तत्कालीन राजकीय प्रवाहाच्या विरोधार जाऊन लाखो कारसेवकांनी महान योगदान दिले. या योगदानाचे सार्थक झाले. स्व. गोपीनाथराव मुंडे, प्रमोदजी महाजन या लढ्यात सहभागी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परीस स्पशनि अनेक विषयांचे सोने झाले. देशाच्या प्रत्येक माणसांच्या मनामनात प्रभू राम चंद्र अवतरले सर्वत्र उत्साह आणि आल्हादायक वातावरण असून, आजचा हा अभूतपूर्व ऐतिहासिक सोहळा अखंड देशासाठी अविस्मरणीय आहे. खर्या अर्थने राम भक्तांचा पाचशे वर्षाचा वनवास आज संपला. असे विचार जिल्ह्याच्या खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी बीड भाजपा तर्फे आयोजित राम उत्सव दरम्यान उपस्थित रामभक्तांना संबोधित करताना मांडले.

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून राम उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवासाठी आचार्य अमृतआश्रम स्वामी महाराज, भाजपा अध्यात्मिक आघाडीचे महंद्र महाराज मस्के, डॉ. सुभाष जोशी, ॲड.सर्जेराव तांदळे, कारसेवक विजयकुमार पालसिंगनकर, प्रा. देविदास नागगोजे, अशोक लोढा, नवनाथ शिराळे, सौ. जयश्रीताई

मस्के, कल्याण तिडके, विक्रांत हजारी, डॉ. लक्ष्मण जाधव, शांतीनाथ डोरले, बालाजी पवार, सोमनाथराव माने, सुनील मिसाळ, संतोष राख, कपिल सौदा, राजू शहाणे,अमोल बडतिले, संगीता धसे, संध्या राजपूत, शैलजा मुसळे प्रीत कुकडेश्वर आदि पदाधिकारी व राम भक्त बहु संखेने उपस्थित होते. या राम उत्सवाचे सूत्र संचालने माल्ती तीपाले यांनी केले. यावेळी अयोध्येतील राममूर्ती प्राण प्रतिष्ठा सोहळ्यानंतर खा. प्रितमताई मुंडे व मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची महाआरती करण्यात आली. जिल्हातील प्रसिध्द गायक भरत अन्ना लोळगे सुस्राव्य राम भजनाचा रामभक्तांनी लाभ घेतला. लोक कलावंत कैलास काटे यांच्या पुढाकारातून अनेक लोक कलाकार या उत्सवात सहभागी झाले होते.एक लाख पणतीतून प्रभू श्रीरामाची प्रतिकृती साकारणारे चित्रकार उद्देश पघळ, त्यांचे सहकारी मानव दुनगुले, सागर माने, राज कराडे, वैभव फरताडे, रोहित माने, योगेश चव्हाण, योगेश घोलप यांच्या सत्कार खा. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते करून, कौतुक करण्यात आले. प्रस्तावित करताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के म्हणाले की, देशभर राममय वातावरण असुन सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला जात आहे. भारतीयांची अस्मिता, प्रभू राम चंद्राचे भव्य मंदिर अयोध्येत जन्मस्थळी उभारले जावे यासाठी मोठा संघर्ष या देशात झाला. अनेकांना बलिदान द्यावे लागले. मोदी सरकारने तमाम हिंदू बांधवांची भावना जपली. भारतीयांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचंड मेहनत घेऊन आज हे स्वप्न साकार केले. आज हा राम उत्सव साजरा करण्याची संधी आमच्या पिढीला मिळाली याचा आम्हाला अभिमान वाटतो असे गौरोद्गार त्यांनी व्यक्त केले. अध्यात्मिक क्षेत्रातील विद्वावान जिल्ह्याचे भूमिपुत्र महामंडलेश्वर आचार्य अमृतआश्रम स्वामी महाराज यांची या उत्सवात विशेष उपस्थिती होती. या मंगलमय सोहळ्यात रामभक्तांना त्यांनी मार्गदर्शन केले. वेणाच्या काळात ज्यांच्या मनात हिंदू धर्माबद्दल ओलावा असेल त्यांच्या बरोबर चालावे लागेल. देव, देश, धर्म आणि परमात्मा यांच्या विषयी जे संशय घेतात त्यांना मुहतोड जबाब देऊन सनातन हिंदू धर्माचे रक्षण समस्त हिंदू धर्मियांनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा शिवसंग्रामच्या वतीने लाडू वाटप करुन साजरा

महाराष्ट्र प्रदेश शिवसंग्रामच्या वतीने दहा हजार लाडूंचे वाटप

बीड (प्रतिनिधी) अयोध्येमध्ये प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश शिवसंग्रामच्या वतीने राज्यभर लाडू वाटपाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला यात राज्यातील विविध जिल्ह्यातील राम मंदिर व इतर मंदिराच्या ठिकाणी दहा हजार लाडूंचे वाटप करण्यात आले.

अयोध्येत भव्य राम मंदिरातील गर्भगृहात राम लला आज विराजमान झाले आहेत. हा सर्व भारतीयांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. ही भारताच्या नव्या अस्मिता पर्वाची सुरुवात आहे . समाजातील सर्व घटकांना समान अधिकार मिळण्याचा क्षण आहे. अयोध्या येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराच्या गर्भगृहात राम लला विराजमान होणाऱ्या क्षणाच्या साक्षीदार सर्व भारतीय झाले आहेत.या क्षणाचा आनंद साजरा करण्याचा संकल्प शिवसंग्रामने घेतला आणि राज्यभर लाडूचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात दिंडोशी येथील कार्यक्रमात डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी उपस्थित राहून दिंडोशीकर नागरिकांशी संवाद साधला. यावेळी आनंद उत्सव साजरा करत लाडू वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुंबईतले जिल्हाध्यक्ष आणि वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी अयोध्या येथील प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सर्वांना मंगलमयी शुभेच्छा दिल्या.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

बीड (प्रतिनिधी): हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त अवघ्या राज्यभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून बाळासाहेब ठाकरे यांची जयंती मोठ्या आनंदत्सवात साजरी करण्यात येत आहे. अगदी याप्रमाणेच बीड जिल्ह्यात देखील बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचा तरुणांमध्ये उत्साह पाहावयास मिळत आहे.

दि. २३ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान बीड शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे बाळासाहेबांना वंदन करण्यासाठी अनेक शिवसैनिक एकत्रित आली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रत्येक शिवसैनिकाने बाळासाहेबांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी किशोर जगताप, सुनील सुरवसे,प्रदीप माने, नवनाथ शिंदे,लक्ष्मण ठाकूर, मुकेश शिवगण, गणेश लोणकर,गणेश काळे, अनिकेत नाटक्रर,भारत देवकते, गणेश भांडवले,नामदेव वांडे, चंदू काळे, नामदेव म्हेत्रे, हनुमान पांडे व शिवसैनिक उपस्थित होते.

मोमीनपुरा भागातील फंक्शन हॉलचे लोकार्पण

मुस्लिम समाजाच्या शुभकार्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांचा प्रयत्न

बीड(प्रतिनिधी) :- शहरातील मोमीनपुरा भागात आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून झालेल्या कुरेशी फंक्शन हॉलचे लोकार्पण शुक्रवारी (दि.१९) रोजी सायंकाळी करण्यात आले. या भगातील सर्वसामान्य मुस्लिम समाजातील बांधवांना या वास्तूचा शुभकार्यासाठी मोठा उपयोग होणार असून आतापासून विविध कार्यक्रमांसाठी हा फंक्शन हॉल उपलब्ध असणार आहे.

बीड शहरातील मोमीनपुरा भागात आ.संदीप क्षीरसागर यांच्या विशेष प्रयत्नातून, अल्पसंख्यांक निधीअंतर्गत कुरेशी फंक्शन हॉल तयार करण्यात आला आहे. समाजातील सर्वसामान्य,गोरगरीब बांधवाना लग्न व इतर शुभकार्यासाठी खाजगी ठिकाणी मोठा खर्च मोजावा लागत होता. यावर आ.क्षीरसागर यांनी अल्पसंख्यांक निधीतून या फंक्शन हॉलच्या बांधकामाला निधी व मंजुरी मिळवून दिली. या वास्तूचे संपूर्ण काम पूर्ण होऊन सुसज्ज असा फंक्शन हॉल तयार झाला असून याचे लोकार्पण आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम तसेच या भागातील प्रतिष्ठित नागरिक व समाजबांधव उपस्थित होते. दरम्यान या लोकोपयोगी वास्तूचा उपयोग समाजातील लोकांसाठी होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

आर्थिक स्वावलंबन समभाव निर्मितीचा मार्ग-रुकसाना मुल्ला

राष्ट्रमाता पूज्य जिजाऊ मैदान नामकरण सोहळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी): - दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी श्री योगेश्वरी शिक्षण संस्था परिसरातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या भव्य मैदानाचे नामकरण सोहळा संपन्न झाला. या मैदानास विश्ववंदनीय राष्ट्रमाता पूज्य जिजाऊ यांचे नाव देण्यात आले आहे. मा. रुकसाना मुल्ला, सामाजिक कार्यकर्त्या ,लातूर यांच्या हस्ते व योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. सुरेश खुरसाळे, कोषाध्यक्ष प्रा.माणिकराव लोमटे, सहसचिव यशोदा राठोड, प्रा. एन .के. गोळेगावकर, प्रा. एस. एस. देशमुख, प्रा. साहेबराव गाठाळ, प्राचार्य रमण देशपांडे, योगेश्वरी पतसंस्थेचे अध्यक्ष मेजर एस. पी. कुलकर्णी, गणेश कदम , डॉ.गणेश पिंगळे, प्रा. रमेश सोनवळकर, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा नामकरण सोहळा संपन्न झाला. जागर लोकशाहीचा आपणा सर्वांचा या उपक्रमा अंतर्गत सभभाव निर्मितीच्या दिशेने या विषयावर व्याख्यान देताना रुकसाना मुल्ला यांनी महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवून निर्णय प्रक्रियेत सक्रिय व्हावे म्हणजे समाजातील लिंगभाव संपून सभभाव निर्माण होईल असे मत मांडले.

चंपावती महोत्सवात सर्वोत्कृष्ट शाळेस मिळणार मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक

बीड (प्रतिनिधी);- बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गतवर्षी प्रमाणे याहीवर्षी फेब्रुवारी महिन्यात आठ दिवासीय चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून असामान्य आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ढोळ्यांचे पारणे फेडणारा हा कलेचा सोहळा मोठ्या धुमधडक्यात संपन्न होणार आहे. चंपावती महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, फॅन्सी ड्रेस, फॅमिली डान्स अशा विविध कलेचे उत्कृष्ट सादरीकरण करत सर्व स्पर्धा प्रकारातून सर्व वयोगटामध्ये सर्वात जास्त बक्षीसांची संख्या प्राप्त करणाऱ्या झेंझी आणि मराठी शाळेस प्रतवर्षी बीड जिल्हातील सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्काराने (बेस्ट स्कूल ऑफ दी एअर

चॅम्पियनशिप) सन्मानित करण्यात येते. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळेचा हा मानाचा बहुमान मिळवण्यासाठी प्रत्येक शाळा आणि त्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक मोठ्या ताकदीने दोन हात करतात आणि सर्वोत्कृष्ट शाळेचा बहुमान प्राप्त करतात. यावर्षी या बाहुमानाचा दर्जा आणखी मोठया स्वरूपात वाढला असून यावर्षी जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळेला महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक देण्यात येणार आहे आणि विशेष म्हणजे हा महाकरंडक देण्यासाठी संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे उपस्थित राहणार आहेत.

बालविवाह प्रतिबंधासाठी कायदेशीर कारवाई करणार : जिल्हाधिकारी

बीड (प्रतिनिधी):- बालविवाह ही कुप्रथाबालविवाह प्रतिबंधासाठी कायदेशीर कारवाई करणार असल्याचे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे या आज बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आढावा बैठकीत म्हणाल्या.

जिल्हयातील बाल विवाह निर्मूलन करण्यासाठी मासिक आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे, जिल्हा महिला व बाल विकास विभागाचे परिविक्षा अधिकारी मंगेश जाधव, चाईल्ड लाईनच्या समन्वयक अश्विनी जगताप, बालविवाह निर्मूलन प्रकल्प- युनिसेफ व एसबीसी थ्री च्या वरिष्ठ प्रकल्प समन्वयक सोनिया हंगे, ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य, माहिला व बाल विकास विभागातील कर्मचारी यावेळी उपस्थित होते. जिल्हात बालविवाह थांबविण्यासाठी ग्राम बाल संरक्षण समितीच्यावतीने अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या माध्यमातून बालविवाह रोखण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, तरीही काही प्रमाणात आणि

काही तालुक्यातील गांवामध्ये बालविवाह सतत होताना दिसत आहेत. ही खेदजनक बाब असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. यापुढे जिल्ह्यातील कुठल्याही भागात बालविवाह होऊ न देणे हाच पर्याय आहे. अन्यथा शिक्षा उपभोगण्यास तयार रहावे, असा संदेश गावपातळीवर आपल्या माध्यमातून दयावा, असे, आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी ऊसतोड कामगार माहिलांच्या बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या लसीकरण, एनएसएस चे प्रशिक्षण, संगाच्या दरम्यान साजऱ्या होणाऱ्या उत्सवांच्यामध्ये माध्यमातून बाल विवाह निर्मूलन करण्याचे प्रयत्न राबविणे या आणि महिला व बाल विकास विभागाशी संबंधित विषयांवर यावेळी सांगोपाग चर्चा करण्यात आली. याप्रसंगी बाल कल्याण समितीचा तिमाही अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला. १ ऑक्टोंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत एकूण १४४४ प्रकरणे दाखल झाली होती. त्यापैकी हाताळलेली प्रकरणे १४३२ असून प्रलंबित प्रकरणे १२ अशी आहेत.